**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शनिवार दिनांक ०८ नोव्हेंबर २०२५**

**ठळक बातम्या**

1. **संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबर पासून सुरु होणार.**
2. **पुणे जमीन घोटाळ्यात दोषीला सोडलं जाणार नाही, अशी मुख्यमंत्र्यांची ग्वाही ; तर अशा व्यवहारांची श्वेतपत्रिका काढून हिवाळी अधिवेशनात चर्चा करण्याची काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांची मागणी.**
3. **भारतीय अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणामध्ये राजस्व अधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन.**
4. **नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी मतदार नोंदणी करण्याचं विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांचं आवाहन.**

---------------------------------------------------

संसदेचं हिवाळी अधिवेशन

संसदेचं हिवाळी अधिवेशन येत्या १ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट द्वारे ही माहिती दिली. १९ डिसेंबरपर्यंत चालणाऱ्या या अधिवेशनात लोकशाही बळकट करणं आणि सामान्य नागरिकांच्या आकांक्षा पूर्ण करण्याच्या दृष्टीनं विधायक चर्चा व्हावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

---------------------------------------------------

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे जमीन घोटाळ्यात कोणत्याही दोषीला सोडलं जाणार नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केलं आहे. नागपूर इथ आज वार्ताहरांशी ते बोलत होते. या प्रकरणातील कराराची नोंदणी पूर्ण झाली आहे, मात्र पैशांचा व्यवहार प्रलंबित आहे. आता दोन्ही पक्षांनी नोंदणी रद्द करण्यासाठी अर्ज केला आहे. मात्र या प्रक्रियेन दाखल केलेला फौजदारी खटला बंद होणार नाही असं फडणवीस म्हणाले ..........

***(होल्ड बाईट - मुख्यमंत्री फडणवीस - ३० सेकंद)***

प्राथमिक चौकशीत दोषी आढळलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली आहे आणि या संपूर्ण व्यवहारात सहभागी असलेल्या अधिकाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

---------------------------------------------------

हर्षवर्धन सपकाळ

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपा महायुती सरकारवर टीका करत राज्यातील सर्व जमीन व्यवहारांची श्वेतपत्रिका तातडीन प्रसिद्ध करण्याची मागणी केली आहे. सरकारचे दररोज नवे घोटाळे उघड होत असल्याचा आरोप त्यांनी मुंबई मध्ये टिळक भवन इथं झालेल्या पत्रकार परिषदेत केला. मुंबई-पुण्यासह कोट्यवधींची जमीन कवडीमोल भावान बळकावली जात आहे. अजित पवार यांचा मुलगा पार्थ पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह अनेकांवर गंभीर आरोप करत त्यांनी एफआयआर आणि कारवाईची मागणी केली. येत्या हिवाळी अधिवेशनात या मुद्द्यावर संपूर्ण दिवस चर्चा व्हावी, अशीही त्यांनी मागणी केली.

---------------------------------------------------

राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी

“भारतीय अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणामध्ये राजस्व अधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. जसजसं राजस्व संकलन वाढेल तसतसा लोक कल्याणकारी योजनांसाठी निधी उपलब्ध होईल,” असं प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केलं. ते आज नागपूर इथल्या राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी-एनएडीटीच्या स्थापना दिवस प्रसंगी आयोजित कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी एनएडीटीचे महासंचालक एस. के. मॅथ्यूज आणि आयकर लवाद प्राधिकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती चंद्रकांत भडंग उपस्थित होते. गडकरी यांनी अधिकाऱ्यांमधील समन्वय, संवाद आणि निर्णय क्षमतेचं महत्त्व अधोरेखित केलं. यावेळी कर्मचाऱ्यांमध्ये नेतृत्व आणि सहकार्य या भूमिका महत्वाच्या असल्याचं सांगताना गडकरी म्हणाले की, ......

***(होल्ड बाईट - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी - २६ सेकंद)***

प्रशिक्षणात अनुभवी अधिकाऱ्यांच्या अनुभवाचा उपयोग करावा, तसच कार्याचही मूल्यमापन आवश्यक असल्याच त्यांनी स्पष्ट केल. यावेळी गडकरी यांनी अकादमीच्या ‘अकादमी स्पंदन’ या हिंदी पत्रिकेच आणि इंग्रजी न्यूजलेटरच प्रकाशन केल. कार्यक्रमात वरिष्ठ आयकर अधिकारी, अकादमीचे कर्मचारी आणि प्रशिक्षणार्थी अधिकारी मोठ्या संख्येन उपस्थित होते.

---

स्थानिक स्वराज्य संस्था

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राजकीय पक्षांकडून जाहीर करण्यात येणाऱ्या प्रमुख प्रचारकांच्या संख्येची मर्यादा आता राज्य निवडणूक आयोगान 20 वरून 40 केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी असलेली प्रमुख प्रचारकांची मर्यादा वाढवून 40 करण्यात यावी, अशी मागणी विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी आयोगाच्या कार्यालयात नुकत्याच झालेल्या बैठकीत केली होती. त्यामुळे ‘महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह आदेश, 2025’ मधील परिच्छेद 26 नुसार राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेऊन ही संख्या वाढविण्यात आली आहे. राजकीय पक्षांना प्रमुख प्रचारकांची यादी संबंधित जिल्हाधिकारी किंवा महानगरपालिका आयुक्त यांच्याकडे सादर करावी लागेल.

---

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

गडचिरोलीचा उल्लेख महाराष्ट्राचं प्रवेशद्वार म्हणून होण्यासाठी शेवटच्या गावापर्यंत विकास पोहोचवण्याकरता राज्यसरकार प्रयत्नशील आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज गडचिरोली जिल्ह्यात सिरोंचा इथं रुबी हॉस्पीटल अँड वेलनेस रुग्णालय आणि महाविद्यालय संकुलाचं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण आरोग्याचा अधिकार असून गडचिरोली सारख्या भागात देखील आरोग्यसेवा पोहोचत आहेत, जिल्ह्याचं चित्र बदलत आहे, असं ते म्हणाले.

---

मतदार नोंदणी

नागपूर विभाग पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी मतदार नोंदणीची प्रक्रिया सुरू असून आतापर्यंत 1 लाख 22 हजार 233 अर्ज प्राप्त झाले आहेत, अशी माहिती विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली. यापैकी 95 हजार 500 अर्ज प्रत्यक्ष, तर 26 हजार 733 ऑनलाईन आले आहेत. दावे आणि हरकती 25 नोव्हेंबर ते 10 डिसेंबर दरम्यान स्वीकारल्या जातील, तर अंतिम मतदार यादी 30 डिसेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहे. पात्र पदवीधरांनी 'महा इलेक्शन डॉट जीओव्ही डॉट इन' या संकेतस्थळावर नोंदणी करण्याच आवाहन करण्यात आलं आहे.

---

९१ वा ग्रँडमास्टर

बुद्धिबळपटू राहुल व्ही. एस. याला भारताचा ९१ वा ग्रँडमास्टर होण्याचा मान मिळाला आहे. सहावी आसियान वैयक्तिक अजिंक्यपद बुद्धिबळ स्पर्धा जिंकल्यानं फिडे अर्थात जागतिक बुद्धिबळ महासंघानं राहुलला ग्रँडमास्टर हा किताब दिला आहे. आठवड्यापूर्वीच चेन्नई मधला इलमपथी ए. आर. भारताचा ९० वा ग्रँडमास्टर बनला तर त्याआधी एस रोहित कृष्णाला देखील हा किताब मिळाला. बुद्धिबळ क्रमवारीत ग्रँडमास्टर ही सर्वोच्च पदवी आहे.

---------------------------------------------------

भारत-ऑस्ट्रेलिया टी-२०

भारत-ऑस्ट्रेलिया टी-२० क्रिकेट मालिकेतला पाचवा आणि शेवटचा सामना आज पावसामुळे रद्द करण्यात आला. त्यामुळ भारतान ही मालिका २-१ अशा फरकान जिंकली आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी पावणे दोन वाजता ब्रिस्बेनमधे हा सामना सुरू झाला. ऑस्ट्रेलियान नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पावसाच्या, व्यत्ययामुळ खेळ थांबला तेव्हा भारताच्या एकही गडी न गमावता ५२ धावा झाल्या होत्या. शुभमन गिल २९ धावांवर आणि अभिषेक शर्मा २३ धावांवर खेळत होते. या विजयासह, भारतान ऑस्ट्रेलिया विरुद्ध T20 मालिका न गमावण्याची आपली १७ वर्षांची परंपरा कायम ठेवली आहे.

---------------------------------------------------

व्हाट्सअ‍ॅप चॅटबॉट

दिव्यांग कल्याण विभागात दिव्यांग व्यक्तींसाठी एआय-आधारित व्हाट्सअ‍ॅप चॅटबॉट क्रमांक ७८ २१ ९२ २७ ७५ कार्यान्वित करण्यात आला आहे. दिव्यांग व्यक्तींसाठी असणाऱ्या योजनांसह तक्रार निवारण व्यवस्था 'एका क्लिकवर' उपलब्ध करून देणं, हा या सेवेचा मुख्य उद्देश आहे. या चॅटबॉटच्या माध्यमातून 'भाषिणी' तंत्रज्ञानाच्या साहाय्यान, टाईप करण शक्य नसलेल्या व्यक्ती आपली तक्रार मराठी किंवा इंग्रजी भाषेत फक्त आवाज रेकॉर्ड करून पाठवू शकतात. आणि संबंधित अधिकाऱ्यांना २४ तासात तक्रारीची दखल घेणं बंधनकारक असणार आहे, असं दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितलं आहे.

---------------------------------------------------

हवामान

विदर्भात आज सर्वात कमी किमान तापमान अमरावती मध्ये १३ पूर्णांक ३ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं, तर नागपुरात आज किमान तापमान १६

अंश सेल्सियस आहे. विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये किमान तापमानात घट होत आहे. आगामी काही दिवस हवामान शुष्क राहणार असल्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागान वर्तवला आहे.

---------------------------------------------------